भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्ती आणि कामकाज चालवणे) अधिनियम, १९९१

(सन १९९१ चा अधिनियम क्रमांक ११)

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Election Commission (Conditions of Service of Election Commissioners and Transaction of business) Act, 1991

(Act No. 11 of 1991)

[ As in force on the 31st January, 2002]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि इलेक्शन कमिशन (कंडिशन ऑफ सर्व्हिस ऑफ इलेक्शन कमिशनर्स अँन्ड ट्रँन्झॅक्शन ऑफ बिझनेस) अॅक्ट, १९९१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ १८ ते २० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

## PREFACE

This edition of the The Election Commission (Conditions of Service of Election Commissioners and Transaction of Business) Act, 1991 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 18 to 20.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

एच ४४५८—१ (१०३५—१—२००४)

# निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्ती आणि कामकाज चालवणे) अधिनियम, १९९१

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक

**प्रारंभिक**


**कलमे**

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.


### प्रकरण दोन

**मुख्य निवडणूक आयुक्त व निवडणूक आयुक्त यांचे वेतन व इतर सेवाशर्ती**


३. वेतन.

४. पदावधी.

५. रजा.

६. निवडणूक आयुक्तास देय असलेले निवृत्तिवेतन.

७. सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत वर्गणी देण्याचा अधिकार.

८. इतर सेवाशर्ती.


### प्रकरण तीन

**निवडणूक आयोगाचे कामकाज**


९. निवडणूक आयोगाचे कामकाज चालवणे.

१०. निवडणूक आयोगाने काम निकालात काढणे.

# [1][निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्ती आणि कामकाज चालवणे)] अधिनियम, १९९१

(१९९१ चा अधिनियम क्रमांक ११)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[२५ जानेवारी, १९९१]

**मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त यांच्या सेवाशर्ती [2][आणि मुख्य निवडणूक आयोगाने कामकाज चालवण्याविषयीच्या कार्यपद्धतीचा उपबंध करण्याकरिता व त्याच्याशी संबंधित किंवा त्याच्याशी आनुषंगिक बाबी निर्धारित करण्यासाठी] अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. या अधिनियमास, [1][निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवाशर्ती आणि कामकाज चालवणे)] अधिनियम, १९९१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "मुख्य निवडणूक आयुक्त" याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ खाली नियुक्त केलेला मुख्य निवडणूक आयुक्त ;

[3][(ख) "निवडणूक आयोग" याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ मध्ये निर्देशित केलेला आयोग ;]

[4][(ग)] "निवडणूक आयुक्त" याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ खाली नियुक्त केलेला अन्य कोणताही आयुक्त.

## प्रकरण दोन

### मुख्य निवडणूक आयुक्त व निवडणूक आयुक्त यांचे वेतन व इतर सेवाशर्ती

३. [5][(*)] मुख्य निवडणूक [6][आणि अन्य निवडणूक आयुक्तांना] सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास देण्यात यणाऱ्या वेतनाइतके वेतन देण्यात येईल : वेतन.

[7][* * * * * * *]

परंतु, मुख्य निवडणूक आयुक्त, किंवा, प्रकरणपरत्वे, निवडणूक आयुक्त म्हणून पदग्रहण करण्याच्या लगतपूर्वीच्या तारखेस जी एखादी व्यक्ती केंद्र शासनाच्या अखत्यारीतील किंवा राज्य शासनाच्या अखत्यारीतील पूर्वीच्या कोणत्याही सेवेतील निवृत्तिवेतन (नि:समर्थता किंवा जखम निवृत्तिवेतन वगळून) घेत असेल किंवा तसे ते घेण्यास पात्र ठरत असल्यामुळे ते निवृत्तिवेतन घेण्याची तिने निवड केली असेल तर, मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त म्हणून तिने केलेल्या सेवेच्या बाबतीत, तिचे वेतन,—

(क) त्या निवृत्तिवेतनाइतक्या रकमेने, आणि

(ख) पदग्रहण करण्यापूर्वी तिच्या पूर्वीच्या सेवेतील तिला देय असणाऱ्या निवृत्तिवेतनाच्या भागाऐवजी वेतनाचे संराशीकृत मूल्य घेत असेल तर, निवृत्तिवेतनाच्या त्या भागाच्या रकमेने, कमी करण्यात येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला.
२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.
३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे नवीन खंड (ख) समाविष्ट केला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे खंड (ख) ला 'ग' असा नवीन क्रमांक दिला.
५. वरील अधिनियमाच्या कलम ५, खंड (क) (एक) द्वारे कलम ३ चे पोटकलम (१) वगळण्यात आले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ५, खंड (क) (दोन) द्वारे 'मुख्य निवडणूक आयुक्तास' या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.
७. वरील अधिनियमाच्या कलम ५, खंड (ख) द्वारे पोटकलम (२) वगळण्यात आले.

पदावधी. ४. मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त, त्याने ज्या तारखेस पदग्रहण केले असेल त्या तारखेपासून सहा वर्षांकरिता, ते पद धारण करील:

[1][परंतु, मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त हा उक्त सहा वर्षांचा पदावधी संपण्यापूर्वी वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करीत असेल, त्याबाबतीत, ज्या तारखेस तो पासष्ट वर्षांचा होत असेल त्या तारखेस तो ते पद रिकामे करील: ]

परंतु आणखी असे की, मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त, राष्ट्रपतींना संबोधून लिहून आपल्या स्वाक्षरीने पदाचा राजीनामा देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी पद धारण करणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्ताच्या बाबतीत किंवा निवडणूक आयुक्ताच्या बाबतीत सहा वर्षांच्या कालावधीची संगणना, त्याने ज्या तारखेस पदग्रहण केले असेल त्या तारखेपासून करण्यात येईल.

रजा. ५. (१) कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त म्हणून पदग्रहण करण्याच्या तारखेच्या लगतपूर्वी जी व्यक्ती शासनाच्या सेवेत असेल त्या व्यक्तीला, अशा तारखेपूर्वी, ती ज्या सेवेत होती त्या सेवेला त्यावेळी लागू असणाऱ्या नियमांत अनुसरून तिच्या पदावधीत परंतु नंतर नव्हे, रजा मंजूर करण्यात येईल व अशा तारखेस तिच्या खाती जमा असलेली रजा पुढे नेण्यास ती हक्कदार असेल.

(२) मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त म्हणून जिची नियुक्ती झाली असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला भारत प्रशासन सेवेच्या सदस्यास त्यावेळी लागू असलेल्या नियमांनुसार रजा मंजूर करण्यात येईल.

(३) मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त यांना रजा मंजूर करणे किंवा नाकारणे व मंजूर केलेली रजा रद्द करणे किंवा कमी करणे याबाबतची शक्ती राष्ट्रपतींकडून निहित असेल.

निवडणूक आयुक्तास देय असलेले निवृत्तिवेतन. ६. (१) मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त म्हणून पदग्रहण करण्याच्या लगतपूर्वी जी व्यक्ती शासनाच्या सेवेत असेल, ती व्यक्ती ज्या तारखेस मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून किंवा निवडणूक आयुक्त म्हणून अधिकार ग्रहण करील, त्या तारखेपासून तिच्या अगोदरच्या सेवेतून निवृत्त झाल्याचे मानण्यात येईल, परंतु तिची मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त म्हणून नंतरची सेवा ही, ती व्यक्ती ज्या सेवेतील असेल त्या सेवेतील निवृत्तिवेतनासाठी अखंड मान्य सेवा म्हणून गणली जाईल.

(२) जेव्हा मुख्य निवडणूक आयुक्त [2][किंवा निवडणूक आयुक्त] पदत्याग करील [मग तो पोटकलम [3][३] मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही रीतीने असो किंवा राजीनामा देऊन केलेला असो.] तेव्हा अशा पदत्यागानंतर तो पुढील गोष्टीस हक्कदार असेल,—

(क) वेळोवेळी विशोधित केलेला, सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश (सेवाशर्ती) अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४१), याच्या अनुसूचीच्या भाग तीनच्या उपबंधानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास देय असलेल्या निवृत्तिवेतनाइतके निवृत्तिवेतन; आणि

(ख) वेळोवेळी विशोधित केलेला उक्त अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांस अनुसरून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास अनुज्ञेय असेल असे निवृत्तिवेतन (निवृत्तिवेतनाच्या संराशीकरणासह), कुटुंब वेतन व उपदान.

[3][ * * * * * * * ]

[4][(३)] जेव्हा मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त राजीनामा देऊन पदत्याग करील तेव्हा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जर त्याने,—

(क) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला पदावधी पूर्ण केला असेल; किंवा

(ख) त्याच्या वयाला पासष्ट वर्षे पूर्ण झाली असतील, [5][ * * * ] किंवा

---

१. १९९४ चा अधिनियम ४, कलम ६ द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७, पोटकलम (क) खंड (एक) द्वारे "मुख्य निवडणूक आयुक्त" या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७, पोटकलम (ख) द्वारे मूळ पोटकलम (३) वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ७, पोटकलम (क), खंड (दोन) द्वारे, मूळ पोटकलम (४) ला पोटकलम (३) असा नवीन क्रमांक दिला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ७, पोटकलम (ग) द्वारे "किंवा प्रकरणपरत्वे बासष्ट वर्षे पूर्ण झाली असतील" हा मजकूर वगळण्यात आला.

(ग) ह्या पदत्याग, अस्वास्थ्यामुळे वैद्यकीयदृष्ट्या आवश्यक आहे, असे प्रमाणित केले असेल, तर आणि तरच केवळ, त्याने पदत्याग केला आहे असे मानण्यात येईल.

७. मुख्य निवडणूक आयुक्त किंवा निवडणूक आयुक्त म्हणून पद धारण करणारी प्रत्येक व्यक्ती सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीला वर्गणी देण्यास हक्कदार असेल (केंद्रीय सेवा). सर्वसाधारण भविष्य-निर्वाह निधीत वर्गणी देण्याचा अधिकार.

८. या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल, त्या व्यतिरिक्त, प्रवासभत्ता, भाडेमुक्त व निवास अशा भाडेमुक्त निवासाच्या मूल्यावर आयकर भरण्यापासून सूट, वाहन सुविधा, अतिथ्य भत्ता, वैद्यकीय सुविधा यांच्याशी संबंधित सेवाशर्ती व [1][सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश (सेवाशर्ती) अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४१) याचे प्रकरण चार व त्याखाली केलेले नियम याअन्वये सर्वोच्च न्यायालयाच्या न्याया-धीशास त्याकाळी लागू असतील अशा इतर सेवाशर्ती, शक्य होईल तेथवर मुख्य निवडणूक आयुक्तास आणि इतर निवडणूक आयुक्तांना लागू होतील.] इतर सेवाशर्ती.

## [2][प्रकरण तीन

### निवडणूक आयोगाचे कामकाज

९. या अधिनियमाच्या उपबंधाच्या अनुसार निवडणूक आयोगाचे कामकाज चालवले जाईल. निवडणूक आयोगाचे कामकाज चालवणे.

१०. (१) निवडणूक आयोग, एकमताने घेतलेल्या निर्णयाद्वारे कामकाजाच्या पद्धतीचे विनियमन करू शकेल, तसेच मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त यांच्यामध्ये कामकाजाचे वाटपही करू शकेल. निवडणूक आयोगाने काम निकालात काढणे.

(२) पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्याव्यतिरिक्त निवडणूक आयोगाचे सर्व काम, शक्य होईल तेथवर एकमताने चालवले जाईल.

(३) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त यांच्यात कोणत्याही बाबींवर मतभिन्नता असल्यास अशा बाबींवर बहुमतानुसार निर्णय घेतला जाईल.]

---

१. १९९४ चा अधिनियम ४, कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी ह्या मजकूर समाविष्ट केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ अधिनियमाच्या कलम ८ नंतर हे प्रकरण समाविष्ट केले.